# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०३/०४/२०१७

## जिल्हयातील सर्वात मोठी प्रोव्हीबिशन रेड

- *४५ लाखांचा मुद्देमाल जप्त: अवैध दारु विक्रेते धास्तावले*

मा. पोलीस अधिक्षक सा़ो. यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री/साठवणूक करुन ठेवणाऱ्या व्यावसायीकांवर आळा घालण्याकरीता रेडसंबंधाने स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविली.

दिनांक ०२/०४/२०१७ रोजी मा. पोलीस अधिक्षक सा़ो. यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे व त्यांचे मार्गदर्शनाखाली श्री. यशवंत नलावडे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सोबत पोहवा बोरकर, पोहवा सहारे, पोहवा उंदिरवाडे, पोहवा दुर्गे, पोना वाळके, नरोटे, पोशि चव्हारे, मपोशि तावाडे, चापोशि प्रशांत, चवरे, पोटे, फोटोग्राफर नादरगे असे गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीचे आधारे मौजा कसनसुर येथील नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील भागातील शेतशिवारात तसेच छत्तीसगड राज्यातून छुप्या मार्गाने दारुची आयात करुन, अवैधरित्या विक्रीकरीता साठवणूक करुन ठेवण्यात आलेल्या ठिकाणी दोन पंचासमक्ष रेड करुन खालील वर्णनाचा व किंमतीचा माल जप्त करुन ताब्यात घेतला.

१) बिडब्लु एम कंपनीच्या १३० पेटया किंमत एकुण १५,६०,०००/- रुपये

२) किंगफिशर स्ट्रांग कंपनीच्या ४६ बियरच्या पेटया किंमत एकुण १,६५,६००/- रुपये

३) फ्रंटलाईन क्लासीक ग्रीन व्हिस्की २१ पेटया किंमत एकुण २,५२,०००/- रुपये

४) इंम्पेरियल ब्लु व्हिस्की कंपनीच्या ४२ पेटया किंमत एकुण ६,०४,८००/- रुपये

५) किंगफिशर सिन्स प्रिमीअम लेझर कंपनीच्या बियर ३८ पेटया किंमत एकुण १,३६,८००/- रुपये

६) गोल्डन गोवा व्हिस्की कंपनीच्या २३ पेटया किंमत एकुण २,२०,८००/- रुपये असा एकूण २९,४०,०००/- रुपयाचा माल तसेच नमूद दारुची वाहतूक करण्याकरीता वापरण्यात आलेले वाहन

७) महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ चारचाकी वाहन किंमत ९,००,०००/- रुपये

८) महिंद्रा पिकप चारचाकी वाहन किंमत ७,००,०००/-रुपये

असा एकुण ४५,४०,०००/- रूपयाचा माल व आपले घरी अवैध दारू साठवणुक करून ठेवणारे इसम नामे किरण सोमाजी दुग्गा व रैजी बिरजा दुम्मा यांना ताब्यात घेतले तसेच दारूची वाहतूक करणारा इसम नामे गोपाल जगदीश मुजुमदार सर्व रा. कसनसुर यास ताब्यात घेतले असून नामे मनोज मुजुमदार व क्रिष्णा मुजुमदार दोन्ही रा. कसनसुर हे फरार आहेत. सदर गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेल्या वाहनांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

नमुद आरोपीतांविरूध्द उपपोस्टे कसनसुर येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास श्री. यशवंत नलावडे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली हे करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेकडून होत असलेल्या कारवाईमुळे गडचिरोली जिल्हयातील अवैध दारू विक्री करणारे तसेच पुरवठा करणारे इसम धास्तावलेले आहेत. जिल्हयामध्ये प्रथमच एवढया मोठया प्रमाणात अवैध दारू साठा मिळून आला आहे. कसनसुर हा भाग संपुर्ण नक्षलप्रभावित असतानांही पोलीसांनी योग्य ती काळजी घेत मोठया प्रमाणात अवैध दारू पकडली आहे. गेल्या महिन्याभरामध्ये एकूण ७० लाखाचा मुद्देमाल व अवैध दारू साठा स्थानिक गुन्हे शाखेकडून जप्त करण्यात आला आहे.

